# शांततेसाठी लष्कराची शाळा

'द मार्शल सेंटर, जर्मनीस्थित शांततेची शाळा. निसर्गरम्य बाव्हेरियन आल्प्स पर्वतराजीतील, गार्मिश पार्तेकिरशेन येथील एका इमारतीत, अमेरिका, युरोप व इतर काही देशांमधील लष्करातील विविध पदांवर काम करणारे अधिकारी एकत्र येतात आणि युद्धासंबंधी नव्हे तर, शांतता राखण्यासंबंधी चर्चा करतात.

१९३७ मध्ये जर्मनीतील पर्वतीय भागात, सैनिकांचे निवासस्थान म्हणून ही इमारत बांधली गेली. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेने या इमारतीचा वापर तुरूंग म्हणूनही केला होता. आज मात्र ही इमारत उभी आहे ती सैनिकांना शांततेचे धडे देण्यासाठी. शीतयुद्धाच्या काळात, १९६४ मध्ये, अमेरिकेच्या लष्कराने रशियासंबंधीच्या कामकाजासाठी या इमारतीचा वापर केला होता. 'डिटॅचमेंट आर' असे नाव धारण केलेली ही संस्था, रशियाने पश्चिम युरोपवर आक्रमण केले तर काम करण्यास सज्ज होती. सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर जगाचे राजकारण एकदम बदलले; तसेच या इमारतीतील कामकाजाचे स्वरूपही.

दुसऱ्या महायुद्धातील अमेरिकेचे लष्करप्रमुख जॉर्ज मार्शल यांनी, लोकशाहीकडे वाटचाल करणाऱ्या स्वतंत्र युरोपच्या निर्मितीसाठी एक योजना (मार्शल प्लॅन) तयार केली होती. या योजनेनुसार युरोपमध्ये शांतता व सहकार्याची धोरणे राबविण्याचे प्रयत्न करण्यात येणार होते. या 'मार्शल प्लॅन' मुळे इमारतीचे नामकरण 'मार्शल सेंटर' असे करण्यात आले. आजही हे 'सेंटर' हीच धोरणे राबविण्यासाठी प्रयत्नशील आहे. सध्या या इमारतीत 'कॉलेज ऑफ इंटरनॅशनल सिक्युरिटी स्टडीज' या संस्थेतर्फे विविध अभ्यासक्रम चालविण्यात येतात. लष्करातील व नागरी प्रशासनातील अधिकाऱ्यांसाठी तीन वेगवेगळे आंतरराष्ट्रीय कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. लोकशाही समाजात राष्ट्रीय सुरक्षा व शांतता राखण्याबाबतचे प्रशिक्षण यांद्वारे देण्यात येते.

वर्षातून दोनदा, अधिकाऱ्यांसाठी पंधरा दिवसांचे प्रशिक्षण, कर्नल पदावरील अधिकाऱ्यांसाठी १५ आठवड्यांचे प्रशिक्षण आणि कॅप्टन व मेजर यांच्यासाठी १० आठवड्यांचे प्रशिक्षण येथे आयोजित करण्यात येते. अमेरिकेच्या नागरिकांसाठी काही विशेष उपक्रमांचे आयोजनही करण्यात येते. त्यात युरोपमधील भाषांचे शिक्षणही देण्यात येते. इंग्रजी, जर्मन, सर्बो-क्रोएशिअन अशा काही भाषा तेथे शिकविल्या जातात. भाषा आली की त्या देशांतील नागरिककांशी संवाद साधणे या अधिकाऱ्यांना सोपे जाते आणि शांततानिर्मितीचे काम सोपे होते. त्यामुळे भाषा, राजकीय मुत्सद्दीपणा व सुरक्षाविषयक धोरणे अशा सर्वांचा एकत्रित विचार या प्रशिक्षणात केला जातो.

लोकशाही देशांमध्ये लष्कराची भूमिका कशा प्रकारची असावी, यासंबंधीचे विशेष प्रशिक्षण येथे देण्यात येते. कारण, युरोपमधील अनेक देश अनेक वर्षे साम्यवादाच्या प्रभावाखालीच होते. अल्बानिया, रूमानियासारख्या काही देशांमधील लष्करी अधिकाऱ्यांनी आपल्या देशाच्या बाहेर पाऊलही टाकलेले नाही. तेव्हा त्यांना इतर देशांची ओळख व्हावी, असा विशेष प्रयत्नही येथे करण्यात येतो. या प्रशिक्षणात एक काळजी घेतली जाते, ती म्हणजे या सर्व अधिकाऱ्यांनी विचार कसा करावा, हे त्यांना सांगितले जाते; मात्र काय विचार करावा हे त्यांना सांगितले जात नाही. हेतू हा की, त्यांची स्वतंत्र विचारशक्ती त्यांनी वाढवावी. एकेकाळी एकमेकांच्या विरोधात

शस्त्रे उचलणारे अधिकारी, या कार्यक्रमांतर्गत एकाच इमारतीत राहतात, त्यांच्यात स्नेहाचे संबंध निर्माण होतात व ते पुढेही टिकतात. विशेषतः बोस्निया, क्रोएशिया व सर्बिया येथील अधिकाऱ्यांनी युद्धाची संहारकता अनुभवल्यामुळे ते असे स्नेहाचे संबंध स्थापन करण्यास फार उत्सुक असतात.

'मार्शल सेंटर' तर्फे, दरवर्षी, लष्करातील व नागरी प्रशासनातील मिळून किमान सहाशेपेक्षा जास्त अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते. आत्तापर्यंत किमान ४७ देशांमधील अधिकाऱ्यांनी येथून प्रशिक्षण घेतले आहे. विविध देशांमधील सरकारे आपल्या देशांमधील अधिकाऱ्यांची निवड करून त्यांना प्रशिक्षणासाठी पाठवत असल्याने या अधिकाऱ्यांना लगेचच आपल्या या शिक्षणाचा व्यवहारात उपयोगही करता येतो. लष्करातील सेवेची आठ वर्षे पूर्ण केलेल्या अधिकाऱ्यांसाठी 'फॉरेन एरिया ऑफिसर्स प्रोग्रॅम' असाही अभ्यासक्रम येथे आहे. या कार्यक्रमांतर्गत विविध देशांमधील लष्करातील अधिकाऱ्यांचे परस्पर सहकार्य वाढते. सध्याच्या आंतरराष्ट्रीय दहशतवादाविरूद्धच्या युद्धात या कार्यक्रमाचा बराच उपयोग झाल्याचे अधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

(संदर्भ - इंटरनेट, सोल्जर्स मॅगेझिन)

❖